# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**अत्यंत तातडीचे**

क्रमांक : ४७४०८ /ग-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, नागपूर

दिनांक : 2 DEC 2016

:: **परिपत्रक** ::

महाराष्ट्र विधानमंडळाचे सन २०१६ चे हिवाळी अधिवेशन सोमवार, दिनांक ५ डिसेंबर, २०१६ पासून विधान भवन, नागपूर येथे सुरु होत आहे. या सत्रासाठी मान्यवरांसाठी उच्च दर्जाची कडेकोट सुरक्षा व्यवस्था करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. **त्या अनुषंगाने विधीमंडळाच्या आगामी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात पुढीलप्रमाणे अद्ययावत सुरक्षा व्यवस्था विषयक कार्यपध्दती ठरविण्यात आली आहे.**

(१) **अधिवेशन कालावधीत कोणत्याही वाहनास विधानभवनाच्या मुख्य व इतर प्रवेशद्वारातुन प्रवेश दिला जाणार नाही.**

(२) मा.सभापती, विधानपरिषद, मा.अध्यक्ष, विधानसभा, मा.मुख्यमंत्री, मा.उपसभापती, विधानपरिषद व दोन्ही सभागृहांचे मा.विरोधी पक्षनेते, मा.मंत्री व मा.राज्यमंत्री महोदय, मा.विधानमंडळ सदस्य, शासनाचे मुख्य सचिव, विधीमंडळाचे प्रधान सचिव व सचिव, शासनाच्या विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, विविध वृत्तपत्रांचे संपादक, वार्ताहर प्रतिनिधी, दुरचित्रवाहिन्यांचे प्रतिनिधी यांच्या वाहनांसाठी वाहनतळ व्यवस्था व प्रवेशपत्रिका (Parking Pass) या परिपत्रकाच्या अ.क्र. १५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे निश्चित केलेल्या असून सदर प्रवेशपत्रिका 'ग-१' कक्षाकडून घेऊन त्या वाहनांवर स्पष्ट दिसतील अशा लावण्यात याव्यात. **सदर प्रवेशपत्रिका असलेल्या वाहनांनाच सुरक्षा विभागाकडून तपासणी केल्यानंतर विधान भवन प्रवेशद्वारापर्यंत प्रवेश दिला जाईल.** सर्व मान्यवरांना प्रत्येकी फक्त एकच प्रवेशपत्रिका देण्यात येईल.

(३) अधिवेशन कालावधीत मा.मंत्रीमहोदयांचे खाजगी सचिव, विशेष कार्य अधिकारी, स्वीय सहायक व शिपाई यांना तसेच मा.सदस्यांच्या एका अधिकृत स्वीय सहायकास विधान भवनामध्ये फोटो ओळखपत्राच्या अधीन राहून प्रवेश देण्यात येईल.

(४) मा.मंत्रीमहोदयांच्या / मा.सदस्यांच्या अंगरक्षकांना विधान भवनात प्रवेश करता येणार नाही.

(५) अधिवेशन काळात मा.मंत्रीमहोदयांना भेटण्यासाठी येणाऱ्या शिष्टमंडळांना कोणत्याही परिस्थितीत विधान भवनामध्ये प्रवेश देण्यात येणार नाही.

..२/-

(६) मा.मंत्रीमहोदयांनी अधिवेशन काळात विभागीय अधिकाऱ्यांना त्यांच्याकडून माहिती अवगत करुन घेण्यासाठी (ब्रिफिंगसाठी) विधान भवनातील त्यांच्या दालनात न बोलविता त्यांच्या निवासस्थानी बोलवावे.

(७) विधान भवन इमारतीमध्ये होणाऱ्या वाढत्या गर्दीमुळे प्राथमिक सुविधांवर पडणारा ताण कमी व्हावा तसेच, सुरक्षा व्यवस्थेची अंमलबजावणी काटेकोरपणे होण्यासाठी मंत्रालयीन विभागांच्या अगदी आवश्यक तेवढ्याच अधिकारी/कर्मचाऱ्यांना विधान भवन प्रवेशपत्रिका देण्यात येतील.

(८) मंत्रालयीन विभागांसाठी असलेल्या अधिकारी गॅलरीमध्ये आवश्यक त्या प्रवेशपत्रिकेशिवाय कोणीही गॅलरीमध्ये प्रवेश करू नये.

(९) स्वत:चे ओळखपत्र तसेच विधानमंडळ सचिवालयाने दिलेली अधिकृत प्रवेशपत्रिका दाखविल्यानंतरच विधान भवनात प्रवेश मिळेल.

(१०) वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींना माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने दिलेले अधिस्विकृतीधारक ओळखपत्र किंवा त्यांच्या वृत्तसंस्थेने दिलेले ओळखपत्र व या सचिवालयाने दिलेल्या प्रवेशपत्रिकेवरच विधान भवनात प्रवेश मिळेल.

(११) खाजगी दूरचित्रवाहिन्यांच्या प्रतिनिधींना त्यांच्या दूरचित्रवाहिन्यांनी दिलेले ओळखपत्र व या सचिवालयाने दिलेल्या प्रवेशपत्रिकेवरच विधान भवनात प्रवेश मिळेल.

(१२) खाजगी दूरचित्रवाहिन्यांच्या प्रतिनिधींची विधान भवन आवारात नेमून दिलेल्या ठिकाणी व्यवस्था करण्यात आली असून त्यांनी त्या जागेवरुनच चित्रीकरण करावे.

(१३) मा.सदस्यांनी त्यांना विधानमंडळ सदस्य म्हणून दिलेला बॅज सहजरित्या दिसेल अशा ठिकाणी लावावा.

(१४) विधान भवन इमारतीमध्ये प्रवेश करतेवेळी सुरक्षा विभागाकडून केली जाणारी सुरक्षा तपासणी ही आपल्या सर्वांच्या सुरक्षिततेसाठी असल्याने या संदर्भात सर्व संबंधितांनी कृपया सहकार्य द्यावे.

(१५) **विधान भवन परिसराबाहेरील वाहनतळाची व्यवस्था तसेच विधान भवन परिसरात वाहन बोलविण्यासाठी ध्वनिक्षेपण व्यवस्था खालीलप्रमाणे करण्यात आली आहे.**

..३/-

| चिन्ह | रंग | विवरण | वाहनतळाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| पी-१ | लाल | मा.सभापती, विधानपरिषद;<br>मा.अध्यक्ष, विधानसभा;<br>मा.मुख्यमंत्री;<br>मा.विरोधी पक्षनेते, विधानपरिषद व विधानसभा;<br>मा.उप सभापती, विधानपरिषद; | विधान भवनासमोरील मार्ग |
| पी-२ | निळा | मा.मंत्री; मा.राज्यमंत्री;<br>मा.मुख्य सचिव, अतिरिक्त मुख्य सचिव, सचिव, महाराष्ट्र शासन;<br>मा.प्रधान सचिव, सचिव, सह सचिव, विधानमंडळ सचिवालय; मा.पीठासीन अधिकाऱ्यांचे सचिव; मुख्य सुरक्षा अधिकारी, विधानमंडळ सचिवालय, विधानमंडळ अधिकारी व शासनाचे वरिष्ठ अधिकारी | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळील परिसर व मिठा निम दर्गा परिसर |
| पी-३ | आकाशी | वृत्तपत्रे व दूरचित्र वाहिन्यांचे प्रतिनिधी (ओ.बी.व्हॅन). | मध्यवर्ती संग्रहालय, नागपूर मार्ग |
| पी-४ | पिवळा | मा.विधानमंडळ सदस्य. | कस्तुरचंद पार्क मैदान |
| पी-५ | पोपटी | वरिष्ठ शासकीय अधिकाऱ्यांची वाहने. | कस्तुरचंद पार्क मैदान |
| पी-६ | हिरवा | विधानमंडळ अधिकाऱ्यांची वाहने. | भारतीय आयुर्विमा महामंडळ वसाहत परिसर |
| पी-७ | जांभळा | इतर प्रवेशधाराकांच्या वाहनांकरिता. | कस्तुरचंद पार्क मैदान |

..४/-

वरील सुरक्षाविषयक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे निदेशानुसार कळविण्यात येत आहे.

( डॉ.अनंत कळसे ) 2/12/2016
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति,

(१) दोन्ही सभागृहांचे सर्व सन्माननीय सदस्य.
(२) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांचे सचिव.
(३) मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव
(४) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, शिबीर कार्यालय, नागपूर.
(५) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
(६) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य.
(७) विभागीय आयुक्त, नागपूर.
(८) आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर-४४० ००१.
(९) जिल्हाधिकारी, नागपूर-४४० ००१.
(१०) पोलीस आयुक्त, नागपूर.
(११) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नागपूर.
(१२) अध्यक्ष, नागपूर सुधार प्रन्यास,नागपूर.
(१३) मंत्रालयातील विभागांचे सर्व अति.मुख्य सचिव, प्रधान सचिव / सचिव.
(१४) मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / विशेष कार्य अधिकारी.
(१५) मा.विरोधी पक्षनेता विधानपरिषद / विधानसभा यांचे खाजगी सचिव.
(१६) संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, नागपूर-४४० ००१.
(१७) उप संचालक, आरोग्य महासंचालनालय, माता कचेरी परिसर, श्रद्धानंत पेठ, दिक्षा भूमीजवळ, नागपूर-४४० ००१.
(१८) प्रवर मुख्य वाणिज्य प्रबंधक, मध्य रेल्वे, नागपूर मंडळ, नागपूर.
(१९) वाणिज्य अधिकारी (नवीन जोडणी), भारत संचार निगम लि., जी.पी.ओ.कंपाऊंड, नागपूर-४४० ००१.
(२०) व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, नागपूर.
(२१) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
(२२) महाराष्ट्र विधानमंडळाचे सर्व अधिकारी व कक्ष.
(२३) महाराष्ट्र विधानमंडळातील सर्व पक्ष कार्यालये.
(२४) मंत्रालयीन विभागाची सर्व शिबिर कार्यालये.